## ई-गव्हर्नन्स शाखा

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स कृति कार्यक्रमांतर्गत 27 केंद्रीय, राज्य व एकात्मिक मिशन मोड प्रकल्पासह 8 पुरक योजना केंद्र शासनाने हाती घेतलेल्या आहेत. वरील योजनेतील पायाभूत योजना खालीलप्रमाणे आहेत.

अ. स्टेट वाईड एरिया नेटवर्क

ब. स्टेट डाटा सेंटर

क. कॉमन सर्व्हिस सेंटर

लातूर जिल्हयाची निवड केंद्रीय 27 प्रकल्पांपैकी ई-डिस्ट्रीक्ट या **Pilot Project** करिता झालेली आहे. कॉमन सर्व्हिस सेंटरअंतर्गत जिल्हयात महा ई सेवा केंद्राची स्थापना शासन निर्णय क्र मातंस/प्रक्र28/39 दि 03 डिसेंबर, 2008 नुसार करावयाची आहे. तसेच स्टेट वाईड एरिया नेटवर्क अंतर्गत जिल्हा प्रशासन ते गावपातळीपर्यंत प्रशासनास नेटवर्कने जोडण्याचे काम करावयाचे आहे.

तसेच राष्ट्रीय नियोजन आयोगाच्या नियंत्रणाखाली विशिष्ठ ओळख प्राधिकरणाची **(UID)** स्थापना करण्यात आलेली असून त्याअनुषंगाने आधार प्रकल्पाची कामे शासन निर्णय क्र.मातंस/2010/प्रक्र71/का-39 दि 09.09.2010 नुसार जिल्हा प्रशासनास सोपविण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र राज्याने ईशासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय क्र.मातंस२०११/प्रक्र१२५/३९ दि.२३.०९.२०११ नुसार महाराष्ट्र शासनाने ई-प्रशासन धोरण जाहीर केलेले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमाद्वारे शासन सेवा जनतेला माफक दरात पुरविण्याबाबत महाराष्ट्र राज्याच्या ई-प्रशासन धोरणात नमुद केलेले आहे. तसेच नागरिकांच्या गरजा आणि उत्तम प्रतीची सेवा पुरवणा-या ई-प्रशासनाबाबतचे कार्यक्रम शासनाकडून राबविण्यात येत आहेत. उपरोक्त कामे ई गव्हर्नन्स विभागातून चालतात.